# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 18 अन्वये तक्रार क्रमांक 156/2007 व तक्रार क्रमांक 157/2007.

श्री.प्रेमदास रेकाजी राठोड,
बी – 8, लिबर्टी एनक्लेव्ह,
जेपीनगर रोड, मालवियानगर,
खामला, नागपूर – 440 025. ..... **तक्रारकर्ता**

**विरूध्द**

श्री.राजेंद्र बेंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32. ..... **गैरतक्रारदार**

## नि र्ण य

तक्रारदार यांनी दिनांक ११.१.२००७ रोजी व दिनांक १९.२.२००७ रोजी अनुक्रमे तक्रार क्रमांक १५७/२००७ व तक्रार क्रमांक १५६/२००७ हे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे दोन तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या दोनही तक्रारीची सुनावणी आज दिनांक १५.५.२००८ रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, दालन क्रमांक ७ (मुख्य), पोटमाळा, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. अ) मा.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांना त्यांनी शपथ घेतल्यापासून आजवर देण्यात आलेले वेतन व इतर भत्ते याची सविस्तर माहिती (सदस्यांचे नांव, हुद्या, खाते, प्रत्येक महिन्यात देण्यात आलेले वेतन व इतर सर्व भत्ते) मला देण्यात यावी. ब) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांच्या आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांची श्रेणीनुसार संख्या व त्यांना आजवर देण्यात आलेले दरमहा वेतन व इतर सर्व भत्त्यांची माहिती देण्यात यावी. क) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांनी शपथ घेतल्यापासून आजवर विविध ठिकाणी केलेल्या रात्रीच्या

... २

मुक्कामाची माहिती (सदस्याचे नांव/महिना/मुंबईतील मुक्कामाची संख्या/गृहजिल्हयातील मुक्कामांची संख्या/राज्यात अन्य ठिकाणी केलेल्या मुक्कामाची संख्या /राज्याबाहेरील मुक्कामाची संख्या/विदेशातील मुक्कामांची संख्या) देण्यात यावी. ड) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांच्या सुरक्षा, परिवहन व दुरध्वनी/मोबाईल यावर यांनी शपथ घेतल्यापासून ते आजवर करण्यात आलेल्या खर्चाची माहवार व मुद्यानिहाय माहिती देण्यात यावी. ई) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्याच्या (सरकारी निवास व विश्रामगृहे वगळून) खाजगी हॉटेल्स व खाजगी अतिथीगृहांतील मुक्कामावर केलेल्या खर्चाची सदस्यनिहाय व महिनानिहाय माहिती देण्यात यावी.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.११.२००६ रोजी आपल्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाला अनुसरुन, आपणास कळविण्यांत येते की, आपण मागितलेली माहिती ठोक (Voluminous) स्वरुपाची असून, सदरची माहिती शासनाकडे संकलित स्वरुपात उपलब्ध नाही. त्यामुळे आपली विनंती मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच आपणास यासंबंधात अपील करावयाचे झाल्यास श्री.रा.का.पवार, सहसचिव तथा अपीलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ येथे करावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल कां केले नाही असे विचारले असता तक्रारदार यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदारास उत्तर हे विलंबाने दिलेले असल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची तक्रार केलेली आहे व त्याकरिता त्यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे.

४. "माझा दिनांक ३.८.२००६ चा अर्ज सामान्य प्रशासन विभागातील जनमाहिती अधिकाऱ्याने दिनांक २९.८.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री.राजेंद्र बेंगले, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पाठविला. त्यानंतर खूप विलंबाने दिनांक २.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी बेंगले यांचे पत्र मला मिळाले. त्यात फक्त माहितीची व्याख्या नमूद करण्यात आली होती आणि मला हवी असलेली माहिती संकलीत स्वरुपात नसल्याचे नमूद केले होते. जनमाहिती अधिकाऱ्याने माहिती नाकारल्या विषयीचे पत्र खूप

विलंबाने पाठविल्याने व याबद्यल दोषी जनमाहिती अधिकाऱ्यावर कारवाईचे अधिकार आयोगालाच असल्याने दिनांक ३०.११.२००६ रोजी मा.मुख्य राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे कलम १८ नुसार तक्रार करण्यात आली होती. माझ्या दिनांक ३०.११.२००६ च्या तक्रारीची प्रत राज्य माहिती आयोगाने पुढील कार्यवाहीसाठी प्रतिवादी जनमाहिती अधिकारी श्री.राजेंद्र बेंगले यांच्याकडेच पाठविली. आधी माहितीची व्याख्या उध्दृत करुन संकलित स्वरुपात माहिती नसल्याचे कारण लेखी कळविणारे जनमाहिती अधिकारी श्री.राजेंद्र बेंगले यांनी माहिती आयोगाने माझी तक्रार पाठविल्यानंतर माहिती नाकारण्यासाठी वेगळेच कारण पुढे केले. दिनांक २.२.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रात मला हव्या असलेल्या माहितीसाठी सबळ कारण दिलेले नाही, त्यामुळे माहिती देता येत नाही असे जनमाहिती अधिकाऱ्याने कळविले. माहितीच्या व्याख्येचे कलम, संकलित स्वरुपात माहिती संबंधात असलेले कलम, लोकहितास्तव माहिती आहे की नाही याविषयी असलेले कलम माहिती असलेल्या या जनमाहिती अधिकाऱ्याने ३० दिवसांच्या कालमर्यादेत माहिती द्यावी लागते या तरतुदीचे मुद्याम पालन केलेले नाही. त्यामुळे कलम २० नुसार दोषी जनमाहिती अधिकारी श्री.राजेंद्र बेंगले हे आर्थिक व प्रशासकीय शास्तीसाठी शंभर टक्के पात्र ठरतात, असे मला वाटते. दरम्यानच्या काळात आपल्या आयोगाचे कार्यालय नागपूरात सुरु झाले. तो पर्यंत माझ्या तक्रारींवर मा.मुख्य राज्य माहिती आयुक्त कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे याविषयीची तक्रार दिनांक ३०.११.२००६ च्या तक्रारीचा संदर्भ देऊन आपल्याकडे दिनांक ११.१.२००७ रोजी दाखल करण्यात आली. या तक्रारीनंतर जनमाहिती अधिकाऱ्याचे नव्या कारणास्तव माहिती नाकारण्या विषयीचे पत्र प्राप्त झाले. त्या पत्राचा विचार व्हावा म्हणून माझ्या दिनांक ११.१.२००७ च्या तक्रारीसोबत जोडण्यासाठी या पत्राची प्रत आपल्या कार्यालयाकडे पाठविली. या पत्राचाही चुकून स्वतंत्र तक्रार म्हणून नोंद झाली. त्यामुळे वर नमुद दोन्ही तक्रारीचा विषय एकच असल्याने एकत्रित विचार व्हावा, अशी विनंती आहे. माहिती नाकारण्यासाठी एकदा एक कारण पुढे करायचे, माहिती आयोगाकडून तक्रार फॉरवर्ड झाल्यावर वेगळे कारण पुढे करायचे हा प्रकार पाहता जनमाहिती अधिकारी श्री.राजेंद्र बेंगले यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील प्रत्येक तरतुदींची चांगली जाण असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे ३० दिवसांच्या कालमर्यादेचे पालन केले नाही म्हणून आणि एकाच अर्जावर माहिती नाकारण्यासाठी वेगवेगळी कारणे दिल्याबद्यल कलम २० नुसार जनमाहिती अधिकारी यांच्यावर आर्थिक व प्रशासकीय शास्ती करण्यात यावी, अशी विनंती आहे".

... ४

५. तक्रारदार यांच्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जातील माहितीच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी असा युक्तीवाद केला की, सदरची माहिती एकत्रितपणे उपलब्ध नसते व ती सदरची माहिती त्या त्या मा.मंत्रिमहोदयांच्या त्या त्या विभागाकडे ती उपलब्ध होवू शकते व त्याकरिता शासन निर्णय सुध्दा आहे. तसेच अंदाजपत्रकामध्ये सुध्दा तरतुद केलेली असते व त्यामुळे संपूर्ण माहिती ही एकत्रित मिळू शकत नाही असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे तक्रारदार यांना मुद्ये निहाय माहिती किंवा त्याबद्यलची वस्तुस्थिती ही मुद्ये निहाय कळविणे आवश्यक असते. ज्या पध्दतीने ती नाकारली आहे त्यावरुन माहिती कशी द्यावयाचीच नाही अशा पध्दतीने दिलेली आहे असे दिसते. तसेच राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदार यांनी दिनांक ३०.११.२००६ रोजी जी तक्रार केलेली होती ती तक्रार सुध्दा वर नमुद केलेल्या दोंन्ही तक्रारीशी निगडीत आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी ही मुख्य राज्य माहिती आयोग यांच्याकडे झाली होती व त्याकरिता दिनांक ५.१०.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.राजेंद्र बेंगळे यांनी खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे. (१) श्री.प्रेमदास रेकाजी राठोड, बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जे.पी.नगर रोड, मालवीय रोड, खामला, नागपूर - २५. यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ अन्वये त्यांच्या दिनांक ३ ऑगष्ट, २००६ च्या अर्जाद्वारे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन २१, दालन क्र. ७, पोटमाळा, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अर्ज केला होता. सदर अर्जाद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे माहिती मागविलेली होती. अ) मा.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांना त्यांनी शपथ घेतल्यापासून आजवर देण्यात आलेले वेतन व इतर भत्ते याची सविस्तर माहिती (सदस्यांचे नांव, हुद्या, खाते, प्रत्येक महिन्यात देण्यात आलेले वेतन व इतर सर्व भत्ते) मला देण्यात यावी. ब) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांच्या आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांची श्रेणीनुसार संख्या व त्यांना आजवर देण्यात आलेले दरमहा वेतन व इतर सर्व भत्त्यांची माहिती देण्यात यावी. क) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांनी शपथ घेतल्यापासून आजवर विविध ठिकाणी केलेल्या रात्रीच्या मुक्कामाची माहिती (सदस्याचे नांव/महिना/मुंबईतील मुक्कामाची संख्या/गृहजिल्हयातील मुक्कामांची संख्या/राज्यात अन्य ठिकाणी केलेल्या मुक्कामाची संख्या /राज्याबाहेरील मुक्कामाची संख्या/विदेशातील मुक्कामांची संख्या) देण्यात यावी. ड) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील सर्व विद्यमान सदस्यांच्या सुरक्षा, परिवहन व

दुरध्वनी/मोबाईल यावर यांनी शपथ घेतल्यापासून ते आजवर करण्यात आलेल्या खर्चाची माहवार व मुद्यानिहाय माहिती देण्यात यावी. ई) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्याच्या (सरकारी निवास व विश्रामगृहे वगळून) खाजगी हॉटेल्स व खाजगी अतिथीगृहांतील मुक्कामावर केलेल्या खर्चाची सदस्यनिहाय व महिनानिहाय माहिती देण्यात यावी. (२) यातील परिवहन बाबतचे उत्तर मी दिनांक २ नोव्हेंबर, २००६ रोजी दिलेले आहे. त्यास ४१ दिवसांचा कालावधी लागल्यामुळे अर्जदाराने अपील दाखल केलेले आहे. या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे असून या विलंबास मी जबाबदार नाही. अ) अर्जदाराचा दिनांक ३.८.२००६ चा मूळ अर्ज जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का. २१ कडे दिनांक ११.८.२००६ रोजी त्यांच्याकडील संदर्भ क्र. ममाअ-२००६/२३४७/२१ प्राप्त झाला. यातील सर्व माहिती जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२१ (रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) या कार्यासनाशी संबंधित असल्याने सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन २१ च्या दिनांक ११.८.२००६ च्या टिप्पणीद्वारे हस्तांतरीत करण्यात आला. हे हस्तांतर जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का. २१ (रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) यांनी दिनांक २१.८.२००६ रोजी मा.सह सचिवांच्या आदेशानुसार स्विकारले. ब) अर्जदाराच्या मूळ अर्जातील कलम "ड" मध्ये नमूद केलेल्या परिवहन बाबतची माहिती अर्जदारास परस्पर पाठविण्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का. २१(रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) यांनी त्यांच्या दिनांक २९.८.२००६ च्या पत्राद्वारे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२८-अ, (श्री.अ.ना.कुलकर्णी, जनमाहिती अधिकारी) मंत्रालय, मुंबई यांना कळविले. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२८-अ (श्री.अ.ना.कुलकर्णी, जनमाहिती अधिकारी) यांनी त्यांच्या दिनांक १९.९.२००६ च्या टिप्पणीद्वारे अर्जदाराच्या परिवहन या मुद्यांवर माहिती देण्यास नकार दिला. क) यावर मा.सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी "मंत्र्यांच्या वाहन दुरुस्तीबाबत तसेच इंधनाच्या संदर्भात सध्या काय Procedure आहे याबाबत का.क्र.२१ ने खुलासा करावा" अशी विचारणा त्यांच्या दिनांक २१.९.२००६ च्या टिप्पणीद्वारे केली. या विचारणेवर अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२१ यांनी त्यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या टिप्पणीद्वारे पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत :- १) मंत्र्यांच्या वाहन दुरुस्तीबाबत

पृ.५/प.वि.वरील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक शापसे-१००५/प्र.क्र.८५/२००५/२८-अ, दिनांक २६ डिसेंबर, २००५ अन्वये वाहनाची दुरुस्ती देखभाल हा विषय संबंधित मंत्र्यांच्या विभागाकडे सोपविण्यात आला आहे. २) मंत्र्यांच्या इंधनाबाबत पृ.११ व पृ.१३/प.वि. वरील संसदीय कार्य विभाग महाराष्ट्र मंत्र्यांचे भत्ते नियम, १९७७ अन्वये नियम क्रमांक ११-अ शासकीय वाहनांचा वापर करताना मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्र्याला वाहन भत्ता दरमहा रुपये ५०००/- देण्यात येतो. (३) मा.सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी त्यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या टिप्पणीद्वारे हे प्रकरण जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२१(रोख) यांच्याकडे अग्रेषित केले. ड) जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२१(रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) यांनी त्यांच्या दिनांक २७.९.२००६ च्या टिप्पणीद्वारे अर्जदाराच्या मूळ अर्जातील कलम ड मधील परिवहन बाबतची माहिती कोणत्या कार्यासनाने द्यावी, याकरिता निर्णय देण्यात यावा, अशी विनंती अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांना केली. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांनी त्यांच्या दिनांक ५.१०.२००६ च्या टिप्पणीद्वारे याबाबतची कार्यवाही कार्यासन २१ ने करावी असा निर्णय दिला व हे प्रकरण अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२१ (रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) कडे पाठविले. तद्नंतर खर्चाच्या संदर्भात अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२१ (रोख) (श्री.हि.रा.सुर्यवंशी, जनमाहिती अधिकारी) ने सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन २८-अ कडे शासकीय परिवहन सेवेने केलेल्या खर्चाची माहिती मागविण्याकरिता मा.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्या. २८-अ यांच्याशी तोंडी चर्चा करुन पाठविले, जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२८-अ (श्री.अ.ना.कुलकर्णी, जनमाहिती अधिकारी) यांनी त्यांच्या दिनांक १८.१०.२००६ च्या टिप्पणीद्वारे ही कागदपत्रे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२१ कडे पाठविली. ती माझ्याकडे दिनांक ३०.१०.२००६ रोजी प्राप्त झाली. (४) अर्जदारास उत्तर देण्यास एवढा कालावधी उलटून गेला असल्याचे माझ्या लक्षात आले. अर्जदाराने मागितलेली माहिती माझ्याकडे संकलित स्वरुपात उपलब्ध नव्हती हे लक्षात घेवून सामान्य प्रशासन विभाग/कार्या. २१ ने प्रथम कायद्याच्या तरतुदीचे अध्ययन केले :- (अ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (फ) प्रमाणे माहितीची व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात

आलेली आहे :- "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्यावेळी अंमलात असलेल्या अन्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. (ब) "माहितीचा अधिकार" हयाचा अर्थ, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) प्रमाणे, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये - (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, (दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, (तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे, (चार) डिस्केट्, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्टआऊट) मार्फत माहिती मिळविणे, याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. ही तरतूद कायदयात नमूद केलेली आहे. यामध्ये कोठेही अर्जदाराने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्यास ती संकलित करुन दयावे अशी कोठेही तरतूद केलेली नाही. अर्जदाराने एकाच अर्जात ठोक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ते देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही. यासंदर्भात कॅप्टन अशोक देशपांडे यांनी लिहिलेले "माहितीचा अधिकार म्हणजे नेमके काय ? सामान्यांच्या भाषेतले, उदाहरणांसहित शंकानिरसन करणारे, मूळ कायद्यासह पहिले अधिकृत पुस्तक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५" याचे अवलोकन करण्यात आले सदर पुस्तकात सन्माननीय डॉ.सुरेश जोशी, मुख्य माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांना शुभ संदेश दिलेला आहे. यावरुन हे पुस्तक माहितीच्या कायद्याचे अधिकृत पुस्तक आहे याबाबत पुष्टी मिळते. सदर पुस्तकात कलम १२ मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे :- जर मागितलेल्या नमुन्यानुसार (फॉरमॅटमध्ये) माहिती देण्याजोगी नसेल, तर अशा वेळी माहिती अधिकाऱ्याने काय करावे ? (य) अर्जदाराशी वाटाघाटी कराव्यात ? (र) आपण माहिती का देऊ शकत नाही, त्याचे सविस्तर आणि लेखी कारण द्यावे ? किंवा (ल) माहिती देण्याचा अर्ज स्विकारण्यास नकार

... ८

द्यावा ? प्रथम आपण हा प्रश्न केव्हा उद्‌भवेल, ते लक्षात घेऊ आणि एक मजेदार शक्यताही लक्षात घेऊ. समजा मला संशोधन करुन डॉक्टरेट मिळवायची तर हौस आहे, पण त्यासाठी स्वत: कष्ट करायची माझी तयारी नाही, म्हणून मी या कायद्याचा फायदा घेण्याचे ठरवले, तर काय होईल ? समजा, मी मस्त माझ्या आरामखुर्चीत बसून एक अर्ज खरडला, "मा. मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, कृपया गेली पाच वर्षे डिसेंबर ते जानेवारी या काळात, महाराष्ट्रात किती चक्रवाक पक्षी आले, त्यांनी कोणत्या कोणत्या पाणवठयांवर मुक्काम केला, त्यांना किती पिल्ले झाली, त्यातली किती पिल्ले मेली वगैरे माहिती मला साध्या पोस्टाने माझ्या घरच्या पत्त्यावर पाठवावी. आपला विश्वासू, सोमाजी गोमाजी कापसे." तर केवळ अर्जाला दहा रुपयांचे तिकीट नियमानुसार लावले आहे आणि पोस्टेज भरायची माझी तयारी आहे, म्हणून मुख्य वनसंरक्षक अधिकाऱ्यांने ही माहिती मला पुरवायची का ? कायद्यातील तरतूद कोणी तरी इतकी लांबवर खेचायची शक्यता आहे, हे लक्षात घेऊनच अशा परिस्थितीत काय करायचे हेही कायद्यात सांगितलेले आहे. जर शासकीय साधनसामग्रीचा फार मोठा अपव्यय अशी माहिती गोळा करण्यात आणि अशा प्रकारची माहिती देण्यात होणार असेल, तर अशी माहिती देण्याचे माहिती अधिकाऱ्यावर बंधन नाही. त्यामुळे अशा प्रकारची ठोक किंवा (Voluminous) माहिती पुरविण्यास तुम्ही नकार देऊ शकता, मात्र प्रथम रीतसर अर्ज स्विकारायचा आणि मग रीतसर नकार द्यायचा, हे विसरु नका. (५) या सर्व बाबी लक्षात घेऊन अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जातील ड) महाराष्ट्र मंत्रिमंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्यांच्या (शपथ घेतलेल्या दिनांकापासून) सुरक्षा, परिवहन व दूरध्वनी/ मोबाईल यावर त्यांनी शपथ घेतल्यापासून ते आजवर करण्यात आलेल्या खर्चाची माहवार व मुद्यानिहाय माहिती देण्यात यावी या मागितलेल्या माहितीचे अवलोकन करुन मी अर्जदारास दिनांक २.११.२००६ च्या पत्राद्वारे पुढीलप्रमाणे उत्तर दिले :- आपल्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाला अनुसरुन, आपणास कळविण्यात येते की, आपण मागितलेली माहिती ठोक (Voluminous) स्वरुपाची असून, सदरची माहिती शासनाकडे संकलित स्वरुपात उपलब्ध नाही. त्यामुळे आपली विनंती मान्य करता येत नाही. (६) आपणास लक्षात आले असेल की, अर्जदाराच्या मूळ अर्जावर काम करण्याच्या संदर्भात आदेशासह जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्या.२८-अ यांची नस्ती क्रमांक संकीर्ण-१००६/प्र.क्र.१५९/०६/२८-अ माझ याकडे कार्यवाहीसाठी दिनांक ३०.१०.२००६ रोजी प्राप्त झाली व मी अर्जदारास दिनांक २.११.२००६ रोजी उत्तर

पाठविलेले आहे. यामुळे मी अर्जदारास ४१ दिवसांच्या विलंबाने उत्तर दिले हा अर्जदाराचा आरोप मला मान्य नाही. झालेली दिरंगाई ही इतर जनमाहिती अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कार्यपध्दतीमुळे झालेली आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये म्हटल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री.हि.रा.सुर्यवंशी यांनी अर्जातील काही माहिती तक्रारदार यांना दिली हे त्यांनी मान्य केले व त्यानंतर सदरच्या अर्जातील उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांनी कोणत्या राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांनी हाताळावी याकरिता ते हस्तांतरीत करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्या पृष्ठार्थ त्यांनी दिनांक १८.१०.२००६ रोजी टिप्पणीही सादर केलेली असून सदर टिपणीची नोटशिट सदरचा विषय हा दिनांक ३०.१०.२००६ रोजी कार्यासन - २१ अवर सचिवाने पुढील कार्यवाही करावी असा आदेश दिला असल्यामुळे त्यानंतरच सदरचा अर्ज हा श्री.राजेंद्र बेंगळे, राज्य जनमाहिती अधिकारी यांच्याकडे आली असे त्यांचे म्हणणे आहे व त्यानंतर त्यांनी दिनांक २.११.२००६ रोजी तक्रारदार यांना उत्तर दिलेले दिसून येते. त्यावरुन राज्य जनमाहिती अधिकारी हे सदरच्या विलंबास जबाबदार नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तक्रारदार अर्जदार यांनी सुध्दा त्यांच्या तक्रारीमध्ये जे एकूणच ५ मुद्यांवरील विषयाचे संदर्भात माहिती मागितलेली आहे ती वेगवेगळया अश्या कार्यासनाकडून किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडून उपलब्ध होते व त्यामुळे एकाच राज्य जनमाहिती अधिकारी यांचे संदर्भात माहिती मागितल्या त्याबद्यलचा विलंब अपरिहार्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अर्जदार यांनी सुध्दा अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्ज करतांना निश्‍चित अशा राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक असते. तरच ती माहिती उपलब्ध होऊ शकते व त्यामुळे सदरचा दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाचे संदर्भामध्ये राज्य जनमाहिती अधिकारी श्री.राजेंद्र बेंगळे हे विलंबास जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यावर सदरची माहिती मा.मंत्री महोदयांच्या त्या त्या विभागात तपशीलवार मिळू शकेल असे सांगितले. मात्र त्यांनी त्यांच्या दिनांक २.११.२००६ च्या परिच्छेद २ मध्ये जे उत्तर दिलेले आहे ते कोणत्या मुद्यांच्या संदर्भात दिलेले आहे हे अधिक स्पष्ट करावयास पाहिजे होते. कारण सदरची माहिती शासनाकडे संकलित माहिती उपलब्ध नाही असे जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये शासनाचे सर्व विभाग हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे व सदरची माहिती कोणत्या ना कोणत्या (विभागाकडे) प्राधिकरणाकडे उपलब्ध असलीच पाहिजे.

त्यामुळे त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी कळवावयास पाहिजे होते. परंतु दिलेल्या उत्तरावरुन माहितीचे स्वरुप पाहता माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा ही निष्कर्ष काढता येत नाही व त्यामुळे तक्रारदार यांच्या तक्रारीतील विलंबाचा मुद्या हा निकाली निघणे तसेच वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचे स्वरुपावरुन ती संकलित नाही त्यामुळे हा ही मुद्या निकाली निघतो. त्यामुळे सदरची दोंन्ही तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे. त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांना उपलब्ध होणे जरुरीचे आहे व त्यामुळे राज्य जनमाहिती अधिकारी यांनी हा विषय हाताळावा असा निर्णय झालेला असल्यामुळे व त्यांनीच ही माहिती वेगवेगळया विभागाकडे मिळू शकेल असे सांगितले असल्यामुळे ती त्या सर्व विभागाकडून संकलित करुन एकत्रितपणे तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) तक्रारदार यांची तक्रार क्रमांक १५६/२००७ व तक्रार क्रमांक १५७/२००७ व या विषयाचे संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे इतर तक्रारी प्रलंबित असल्यास त्या सर्व तक्रारी खारीज करण्यात येत असल्या तरी तक्रारदार यांना राज्य जनमाहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र मंत्री मंडळातील प्रत्येक विद्यमान सदस्यांच्या परिवहनाच्या संदर्भातील माहिती वेगवेगळया विभागातून तपशीलात मिळू शकेल असे सांगितल्यामुळे त्यांनीच ती संकलित करुन उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती ३० दिवसात संकलित करुन देण्यात यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**